**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११ ००४.**

**परिपत्रक /क्र.रा.मं./संशोधन/भाषाविषय कृतिपत्रिका/उच्च माध्यमिक/मूल्यमापन/३२६९ दिनांक २२/०६/२०१८.**

**विषय** – उच्चमाध्यमिक स्तरावरील इ.१२ वी साठी २०१८-२०१९ पासून मराठी, हिंदी, इंग्रजी, गुजराती, उर्दू, संस्कृत, कन्नड, तेलुगु, सिंधी या नऊ भाषा विषयांना कृतिपत्रिकेप्रमाणे (Activity sheet) मूल्यमापन योजना लागू करणेबाबत.

**संदर्भः**- परिपत्रक /क्र.रा.मं./संशोधन/भाषाविषय कृतिपत्रिका/उच्च माध्यमिक/मूल्यमापन/ २४६३/ दि.९/५/२०१७.

या परिपत्रकान्वये राज्यातील सर्व मान्यताप्राप्त उच्च माध्यमिक शाळांच्या मुख्याध्यापकांना/प्राचार्यांना कळविण्यात येते की, उच्च माध्यमिक स्तरावरील पुनर्रचित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी इयत्ता ११ वी साठी शैक्षणिक वर्ष २०१२-१३ या वर्षापासून आणि इयत्ता १२ वी साठी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ या वर्षापासून सुरु झालेली आहे.हे आपणास विहित आहेच.

इयत्ता १२ वी साठी मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, गुजराती, उर्दू, कन्नड, तेलुगु, सिंधी या नऊ भाषा विषयासाठी कृतिपत्रिका (Activity sheet) तयार करण्यात आली असून या भाषा विषयांची प्रचलित पाठ्यपुस्तके बदलणार नाहीत. या पाठ्यपुस्तकातील घटक, स्वाध्याय, उपक्रम यावर आधारित कृतिपत्रिका स्वरूपात मूल्यमापन अपेक्षित आहे. सदर बदल हा एकूण ८० गुणांच्या लेखी परीक्षेसाठी आहे. २० गुणांच्या तोंडी परीक्षेत काहीही बदल केलेला नाही.(इ. ११ वीसाठी सन-२०१७-२०१८ मध्ये कृतिपत्रिकेप्रमाणे मूल्यमापन योजना सुरू झालेली आहे.)

इयत्ता १२ वी साठी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून मराठी, हिंदी, इंग्रजी, संस्कृत, गुजराती, उर्दू, कन्नड, तेलुगु, सिंधी या नऊभाषा विषयांना कृतिपत्रिकेप्रमाणे (Activity sheet) मूल्यमापन योजना लागू करण्यात येत आहे. संस्कृत भाषा विषयाची कृतिपत्रिका फक्त संस्कृत या एकाच माध्यमामध्ये तयार करण्यात येणार आहे. सदर कृतिपत्रिकेप्रमाणे (Activity sheet) मूल्यमापन योजनेसंबंधी सूचना आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील/ उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक, विद्यार्थी ,पालक व सर्व संबधित यांच्या निदर्शनास आणून या परिपत्रकानुसार योग्य ती पुढील कार्यवाही करण्यात यावी.

आदेशान्वये.

प्र. सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक
व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे-४११००४

प्रतः माहिती व कार्यवाहीस्तव सादर -

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,नागपूर विभागीय मंडळ, नागपूर-४४० ००१**

---

पत्र क्रमांक:नाविमं/संशोधन/प्रशिक्षण/ 2550
नागपूर, दिनांक 12/7/2018

प्रति,

संचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
जुने सचिवालय,सिव्हील लाईन्स, नागपूर

उपरोक्त प्रकटन कृपया आपल्या कार्यकक्षेतील सर्व वृतपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी देवून मंडळास सहकार्य करावे, ही विनंती.

विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

सहपत्र- १० प्रती